**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, चे कलम १५४ अन्वये नागपूर मेट्रो रेल कॉरिडॉर (NMRC) साठी मंजूर नागपूर विकास नियंत्रण नियमावलीत अतर्गत अनुज्ञेय करण्यात आलेल्या अतिरिक्त चटई क्षेत्रा करीता अधिमूल्याचा दर निश्चित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई-३२.**
**दिनांक : २४/०७/२०१७**

**आदेश**

**क्र.टिपीएस-२४१६/प्र.क्र.१७६/२०१६/नवि-९**:- ज्याअर्थी, शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, चे कलम ३७ पोटकलम १(कक) (ग) मधील तरतूदीनुसार (यापूढे ज्याचा उल्लेख उक्त अधिनियम असा करण्यात आलेला आहे) नागपूर महानगरपालिका क्षेत्र व नागपूर मेट्रो क्षेत्रामध्ये नागपूर मेट्रो रेल्वेच्या दोन स्वतंत्र मार्ग प्रस्तावित करण्यात आले आहेत. दोन्ही मार्गीकांचे मध्यापासून तसेच स्टेशन सभोवतालच्या दोन्ही बाजूस ५०० मी.अंतरापर्यंत NMRC क्षेत्र घोषित करण्यात आले आहे. त्या NMRC क्षेत्रामध्ये रस्त्यांच्या रुंदीनुसार व त्या सन्मुख भुखंडाचे क्षेत्राच्या अनुषंगाने २ ते ४ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्यात आले आहे. त्यामध्ये मंजूर विकास नियंत्रण नियमावली नुसार जमिन वापरा अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या चटई क्षेत्र निर्देशांक (Base FSI) वगळून NMRC अंतर्गत भुखंडाचे स्थान व क्षेत्रानुसार अनुज्ञेय होणा-या अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक करीता ही अधिमूल्य आकारणी करणे बाबत निर्णय शासनाने घेतलेला आहे. या फेरबदलाची शासनाने अधिसूचना क्र. टिपीएस२४१४/ ४७७/ प्र.क्र. २४८/२०१४/नवि-९ दि. ९/६/२०१७ अन्वये निर्गमित करण्यात आली आहे (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त अधिसूचना असा करण्यात आलेला आहे);

आणि ज्या अर्थी उक्त अधिसुचनेद्वारे मंजूर करण्यात आलेल्या अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकासाठी अधिमूल्य आकाराण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होते;

आता त्याअर्थी, नियोजन प्राधिकरणाच्या स्तरावरुन अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करताना अधिमूल्य आकारणीबाबतचे दर खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे;

**NMRC**

| **अ.क्र.** | **अधिमूल्याचा दर (वार्षीक मूल्यदराच्या %)** | |
|---|---|---|
| | **सदनिकांची घनता नियम क्र.१.२.२(अे) प्रमाणे प्रस्तावित असल्यास** | **सदनिकांची घनता नियम क्र. १.२.२ (अे) प्रमाणे अपेक्षित घनतेपेक्षा कमी प्रस्तावित असल्यास** |
| १. | ३०% | ४०% |

(अ) NMRC साठीच्या अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकसाठी आकारण्यात येणा-या अधिमुल्याची रक्कम शासन निर्णय क्रमांक नासुप्र-३३१३/प्र.क्र.४१/नवि-७ दि.३०.०१.२०१४ नुसार संबंधित नियोजन प्राधिकरणाने वसूल करणे व त्यापैकी ५०% रक्कम पायाभूत सुविधांच्या सुधारणांसाठी स्वत:कडे ठेवून घेऊन उर्वरित ५०% रक्कम सदर प्रकल्पासाठी नियुक्त एसपीव्ही यांस देण्यात यावी.

(ब) संबंधित नियोजन प्राधिकरणाने अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक मंजूरीचे पत्र देताना त्यामध्ये आवश्यक ते अधिमूल्य रक्कम भरणा करण्याबाबत संबंधित जमिन मालक/ विकासक यांना कळविण्यात यावे.

(क) शासकीय / निमशासकीय / नियोजन प्राधिकरणाच्या जमिनीसाठी उपरोक्त प्रमाणे अधिमूल्य वसूलीची बाब लागू होणार नाही.

(ड) सदर आदेश या शासन आदेशाच्या दिनांकापासून लगोलग अंमलात येतील.

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI 32

(संजय सावजी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत माहितीसाठी व उचित कार्यवाही साठी:-**

१) विभागीय आयुक्त, नागपूर.
२) जिल्हाधिकारी, नागपूर.
३) आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर
४) सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
५) सह संचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर
६) सहायक संचालक, नगर रचना शाखा, नागपूर.
७) कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.
सदरचे शासन परिपत्रक शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावा.
८) निवडनस्ती (नवि-९).